**प्रेसनोट दि. २७/१२/२०१७** खडकी पोलीस स्टेशन, पुणे शहर

## ओलक्स ॲप वरिल जाहिराती पाहून वाहनचोरी करुन फसवणूक करणा-यास अटक

खडकी पोलीस स्टेशन कडील तपास पथकातील कर्मचारी पेट्रोलिंग करीत असताना पोना घुटे यांना त्यांच्या बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, खडकी पोलीस स्टेशन गु र नं ३००/१७ भादवि ४२० ३७९ मधील इसम नामे राहुल मांगीलाल प्रजापती वय २२ रा विश्रांतवाडी पुणे याने सदरचा गुन्हा केला आहे अशी माहिती मिळाल्यानंतर सदरची माहिती मा. वरिष्ठ पोलीस निरीक्षक खडकी पोलीस स्टेशन यांना कळविल्याने त्यांनी मिळालेली माहिती शहानिशा करुन कारवाई करणेबाबत मार्गदर्शन केले त्याप्रमाणे वरिल नमूद इसम यास इंजिनिअरिंग कॉलेज चौक शिवाजीनगर पुणे याठिकाणी ताब्यात घेवून दाखल गुन्हयाच्या अनुषंगाने तपास करता त्याने दाखल गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले आहे. त्याच्याकडून गुन्हयातील चोरीस गेलेली टू व्हीलर गाडी जप्त करण्यात आली आहे. OLX ॲप वर जाहिराती पाहून टू व्हीलर मालकास प्रत्यक्ष भेटून टू व्हीलर गाडीची टेस्ट राईड घेतो असे सांगून टेस्ट राईडसाठी गाडी घेवून तो गाडीसह पसार होत असे अशी आरोपीची मोडस आहे. आरोपी याचेकडून गुन्हयात चोरीस गेलेली टू व्हीलर गाडी जप्त करण्यात आली आहे.

सदर कामगिरी पोलीस उप-आयुक्त श्री दिपक साकोरे, सहा. पोलीस आयुक्त श्री गणेश गावडे यांचे मार्गदर्शनाखाली खडकी पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरिक्षक श्री लक्ष्मण बोराटे व पोलीस निरीक्षक गुन्हे श्री अजित लकडे, पोलीस उप-निरीक्षक श्री अमित गोरे, पोलीस कर्मचारी किरण घुटे, तुषार शिंदे, प्रदिप गाडे यांनी केलेली आहे.

